# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/01/2024 (शनिवार) सायंकाळ

---

### जनावरे चोरी

**पो.स्टे. कळमेश्वर**:— अंतर्गत ०७ किमी अंतरावर सिंधी (झुनकी) येथे दिनांक ११/०१/२०२४ चे २३.५० वा. ते दिनांक १२/०१/२०२४ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— दिपक छत्रपती निकम, वय २६ वर्ष रा. सिंधी (झुनकी) याचे गावा शेजारी शाळेजवळ गोठा आहे. त्या गोठयामध्ये गायी व बकऱ्या दररोज बांधून ठेवतो. दि. ११/०१/२०२४ रोजी रात्री दरम्यान ५ बकऱ्या टिनाच्या शेड व साईडला ताटया ओपन असलेल्या गोठयामध्ये बांधुन ठेवल्या होत्या त्यामधल्या दोन मोठया बकऱ्या पांढऱ्या रंगाच्या किंमती १५०००/—रू., दोन बोकडे पांढऱ्या रंगाचे किंमती १०,०००/—रू., एक पाठ पांढऱ्या रंगाची किंमती ३०००/— रू. असा एकुण २८,०००/—रू चे बकऱ्या कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेलेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपींविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असुन सदर घटनास्थळी पोलीस हवालदार संजय वानखेडे यांनी भेट दिली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार संजय वानखेडे, मो. नं. ९९२२७९१९१८ हे करीत आहे.

### सोन्याचे दागिने चोरी

**पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत कोंढाळी बसस्टॉप येथे दिनांक १०/०१/२०२४ चे १३.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— श्रीमती मालती मधुकर सांडेल वय ६३ वर्षे रा. आर्वी खरडी वार्ड हनुमान मंदीरजवळ जि. वर्धा व तिचा मोठा मुलगा सुन नात व नातीन सह भंडाऱ्यावरून दिराच्या मुलाचे लग्नावरून आर्वी जि. वर्धा येथे साकोली अकोला जाणाऱ्या बसने जात असता एक अनोळखी महीला फिर्यादीचे सिटवर बसली होती. १३.०० वा. बस कोंढाळी येथे थांबली असता चहा पिण्याकरीता फिर्यादीने पर्स बसच्या सिटवर ठेवुन चहा प्यायला गेली असता फिर्यादीचे सिटवर बसलेली अनोळखी स्त्री वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे ही कोंढाळी येथे उतरून गेली तरी फिर्यादीने तरी पर्स मध्ये ठेवलेली १४ ग्रॅमची सोन्याची पोत ज्यामध्ये गोल मणी, लांब पोळे (लांब मणी) व लॉकेट असलेले किंमती अंदाजे ३०,०००/—रू ची व नगदी ८००/— रू. दिसुन आले नाही यावरून फिर्यादीची खात्री झाली की, कोंढाळी येथे बसमध्ये फिर्यादीचे सिटवर बसलेली ती अनोळखी बाई वय ३५ ते ४० वर्षाची जी बस मधुन कोंढाळीलाच उतरून गेली त्याच बाईने फिर्यादीची सोन्याची पोत व नगदी ८००/— रू असा एकुण ३०,८००/—रू चा मुद्देमाल फिर्यादीच्या पर्समधुन काढुन चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे अनोळखी महिला आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. महिला आरोपीचा शोध घेणे सुरू असुन सदर घटनास्थळी सहायक पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे यांनी भेट दिली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार पवार हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**